# शब्द देही झाला

ख्रिस्तसिद्धांतावरील
लीगोनियर
विश्वासांगीकार

# शब्द देही झाला

## ख्रिस्तसिद्धांतावरील लीगोनियर विश्वासांगीकार

Ligonier Ministries

The Word Made Flesh: The Ligonier Statement on Christology
Copyright © 2016 by Ligonier Ministries
Second edition
Published by Ligonier Ministries
421 Ligonier Court, Sanford, FL 32771
Ligonier.org | ChristologyStatement.com
All Scripture quotations are from The Marathi Pavitra Shashtra (O.V.) of Bible Society of India, Used by permission. All rights reserved.
ISBN: 978-1-64289-534-6
--------------------

शब्द देही झाला : ख्रिस्तसिद्धांतावरील लीगोनियर विश्वासांगीकार
मराठी प्रकाशन अधिकार © 2023 लिगोनियर मिनिस्ट्रीज द्वारे
मराठी आवृत्ती लिगोनियर मिनिस्ट्रीज द्वारे प्रकाशित
421 लिगोनियर कोर्ट, सॅनफोर्ड, FL 32771
Ligonier.org | ChristologyStatement.com
सर्व पवित्र शास्त्रातील अवतरण बायबल सोसायटी ऑफ इंडियाच्या मराठी पवित्र शास्त्र (O.V.) मधील आहेत, परवानगीने वापरलेले आहेत. सर्व हक्क राखीव.



येशू ख्रिस्त कोण आहे? जवळजवळ प्रत्येक प्रौढ व्यक्तीचे येशूबद्दल काहीतरी मत असते. ही मते वरवरची, मूलभूत माहिती नसलेली किंवा अगदी खोट्या शिक्षणावर आधारलेली अशी विधर्मी देखील असू शकतात. केवळ मत नाही, तर येशूबद्दलचे सत्य महत्त्वाचे आहे. . . आणि ते अनंतकाळासाठी महत्त्वाचे आहे.

जे लोक *ख्रिस्ती* हे नाव धारण करतात ते ख्रिस्ताचे शिष्य म्हणून त्याचे अनुसरण करण्याचा दावा करतात. त्यांच्याकडे एक ख्रिस्तसिद्धांत आहे – ख्रिस्ताबद्दलची वस्तुनिष्ठ शिकवण - ज्यावरून त्यांचा ख्रिस्ताबद्दलचा दृष्टिकोन दिसून येतो. हा ख्रिस्तसिद्धांत अप्रत्यक्षपणे किंवा प्रत्यक्षपणे शब्दांमध्ये व्यक्त केला जाऊ शकतो. तो पवित्र शास्त्र-आधारित प्रकटीकरणाचा सखोलपणा आणि पवित्र शास्त्रावरील ऐतिहासिक ख्रिस्ती विचार उदाहरणाच्या स्वरूपात प्रकट केला जाऊ शकतो किंवा तो देवाच्या वाचनाशी न जुळणारा आणि त्याच्याशी काहीही संबंध नसलेला असू शकतो. परंतु एकही ख्रिस्ती मनुष्य असा नाही की त्याच्याकडे ख्रिस्तसिद्धांत नाही.

ख्रिस्ताचे अनुसरण करणे हे ख्रिस्ती धर्माच्या केंद्रस्थानी असल्यामुळे, मंडळीने शतकानुशतके आपल्या कल्पनेतील ख्रिस्ती नव्हे, तर इतिहासातील आणि पवित्र शास्त्रातील ख्रिस्त घोषित करण्यासाठी परिश्रम घेतले आहेत. नायसिन सिद्धांतसंग्रह, चाल्सेडॉनची व्याख्या (किंवा चाल्सेडॉन सिद्धांतसंग्रह), हेडलबर्ग प्रश्नोत्तरपाठ आणि वेस्टमिन्स्टर विश्वासांगीकार यांसारख्या विश्वासाच्या ऐतिहासिक विधानांमध्ये, ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्तावरील पवित्र शास्त्रसंबंधीची शिकवण स्पष्टपणे मांडली आहे.

आज, ह्या विधानांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते किंवा त्याबद्दल लोकांच्या मनात गैरसमज असतात, परिणामी ख्रिस्ताच्या व्यक्तीत्वाबद्दल आणि कार्याबद्दल व्यापक संभ्रम निर्माण झालेला आहे. ख्रिस्ताच्या गौरवासाठी आणि त्याच्या लोकांच्या उन्नतीसाठी, ख्रिस्तसिद्धांतावरील लिगोनियर विश्वासांगीकार हा ख्रिस्ती मंडळीच्या ऐतिहासिक, सनातनी, पवित्र शास्त्रसंबंधीच्या ख्रिस्तसिद्धांतातील आवश्यक वैशिष्टे अशा पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो, जी कबूल करण्यास सोपी, मंडळीचा टिकाऊ विश्वास काय आहे हे शिकवण्यास मदत करण्यासाठी उपयुक्त, आणि एक सामान्य पापांगीकार म्हणून उपयोगात आणण्यास योग्य असतील ज्याद्वारे वेगवेगळ्या मंडळीमधील विश्वासणारे सहकार्याने सुवार्तेच्या कार्यासाठी एकत्र येऊ शकतील. हा विश्वासांगीकार मंडळीच्या ऐतिहासिक विश्वासांगीकाराची आणि पापांगीकराची जागा घेण्याच्या उद्देशाने नाही तर ख्रिस्त कोण आहे आणि त्याचे कार्य काय आहे याविषयीची त्यांची सामूहिक शिकवण स्पष्ट करणारे हे एक परिशिष्ट आहे. ख्रिस्ताने याचा उपयोग त्याच्या राज्यासाठी करावा ही इच्छा.

देवाचा पुत्र, आपला संदेष्टा, याजक आणि राजा, याच्या नावाने,

आर.सी. स्प्रोल

वसंत २०१६

करारनामा

आम्हीं हे रहस्य आणि अद्भुत कबूल करतो

की देव देही झाला

आणि आमच्या महान तारणात *हर्षोल्लास* करतो आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे.

पिता आणि पवित्र आत्मा यांच्या बरोबरीने,

पुत्राने सर्व काही निर्माण केले,

आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे,

आणि सर्व गोष्टी नवीन बनवतो.

खरा देव,

जो वस्तुतः मनुष्य झाला,

एका व्यक्तीमध्ये दोन स्वभाव.

त्याचा जन्म कुमारी मरीयेपासून झाला

आणि आम्हांमध्ये वस्ती केली.

वधस्तंभावर खिळला गेला, मरण पावला व ज्याला पुरले, तिसऱ्या तो दिवशी मेलेल्यातून उठला,

स्वर्गात चढला,

आणि जो पुन्हा येणार आहे

गौरवाने आणि न्याय करण्यासाठी.

आमच्यासाठी,

त्याने नियमशास्त्र पाळले,

पापासाठी प्रायश्चित केले,

आणि देवाचा क्रोध शमविला.

त्याने आमच्या घाणेरड्या चिंध्या स्वतःवर घेतल्या
आणि आम्हांला
त्याचा नीतिमत्वाचा झगा दिला.

तो आमचा संदेष्टा, याजक आणि राजा आहे,
जो मंडळीची उभारणी करत आहे,
आमच्यासाठी मध्यस्थी करत आहे,
आणि सर्व गोष्टींवर राज्य करत आहे.

येशू ख्रिस्त आमचा प्रभु आहे;
आम्हीं त्याच्या पवित्र नावाची सदैव स्तुती करतो.

आमेन.



# समर्थन आणि नकार

## *आणि पवित्र शास्त्रातील पुरावे*

*कलम १*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू हा देवाच्या सनातन पुत्राचे इतिहासात झालेले देहरूप आहे, पवित्र त्रैक्यातील दुसरी व्यक्ती. असा तो ख्रिस्त, देवानें अभिवचन दिलेला मुक्तिदाता आहे.[1]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्त हा केवळ मनुष्य आहे किंवा तो सुरवातीच्या ख्रिस्ती मंडळीची काल्पनिक निर्मिती होता.

*कलम २*

आम्हीं विश्वास ठेवतो की देवत्वाच्या ऐक्यामध्ये एकुलता एक सनातन पुत्र हा पित्याशी आणि पवित्र आत्म्याशी एकरूप *(होमोसिओस),* समतुल्य, आणि त्यांच्याच बरोबरीने सार्वकालिक आहे.[2]

आम्हीं नाकारतो की पुत्र केवळ देवासारखा *(होमोसिओस)* आहे किंवा त्याला पित्याने केवळ त्याचा पुत्र म्हणून दत्तक घेतले. आम्हीं नाकारतो की सत्स्वरूपमीमांसा तत्वज्ञानविषयक *(ऑन्टोलॉजिकल)* त्रैक्यामध्ये पुत्र सनातन काळापासून पित्याच्या अधीन आहे.

*कलम ३*

आम्हीं नायसिन आणि चाल्सेडोनियन विश्वासांगीकाराशी सहमत होऊन विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त हा पूर्ण देव आणि पूर्ण मनुष्य आहे, दोन स्वभाव एकाच व्यक्तीमध्ये कायमचे एकत्र आहेत.[3] आम्हीं नाकारतो की पुत्राला निर्माण करण्यात आले होते. आम्हीं नाकारतो की एके काळी पुत्र दैवी नव्हता.

आम्हीं नाकारतो की इतिहासात पुत्राच्या देह धारणेपूर्वी येशू ख्रिस्ताचे मानवी शरीर आणि मानवी आत्मा अस्तित्वात होते.

---

1 प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता...शब्द देही झाला, आणि कृपा व सत्य यांनीं परिपूर्ण असून त्यानें आम्हांमध्यें वस्ती केलीं; आम्हीं त्याचें गौरव पाहिलें तें गौरव पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचें असावें असें होतें. (योहान १:१,१४) हे संदर्भ देखील पाहा: स्तोत्र. ११०:१; मत्तय ३:१७; ८:२९; १६:१६; मार्क १:१; ११; १५:३९; लूक २२:७०; योहान ४:२५-२६; प्रे. कृ. ५:४२; ९:२२; गलती. ४:४; फिलिप्पै. २:६; कलस्सै. २:९; इब्री. ५:७; १ योहान ५:२०;

2 यास्तव तुम्हीं जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामानें बाप्तिस्मा द्या (मत्तय २८:१९). हे संदर्भ देखील पाहा: योहान १:१८; ३:१६-१८; १०:३०; २०:२८; २ करिंथ. १३:१४; इफिस. २:१८.

3 कारण ख्रिस्ताच्या ठायींच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान् वसते (कलस्सै. २:९). हे संदर्भ देखील पाहा: लूक १:३५; योहान १०:३०; रोम. ९:५; १ तीमथ्य. ३:१६; १ पेत्र. ३:१८.

*कलम ४*

आम्हीं एका व्यक्तित्वात दोन स्वभावांचे अस्तित्व *(हायपोस्टॅटिक युनियनची)* याचे समर्थन करतो, की येशू ख्रिस्ताच्या एकाच व्यक्तिमत्वामध्ये दैवी व मानवी स्वभावांच्या सत्वांचे एकीकरण झाले आहे, म्हणजेच येशू ख्रिस्ताचे दोन स्वभाव त्याच्या एकाच व्यक्तीत्वामध्ये कुठलेही मिश्रण, संभ्रम, व विभाजन किंवा वियोग न करता एकच आहेत.[4]

आम्हीं हे नाकारतो की दोन स्वभावांमध्ये फरक करणे म्हणजे त्यांना विभक्त करणे आहे.

*कलम ५*

येशू ख्रिस्ताच्या देह धारण करण्यात, त्याच्या दैवी आणि मानवी स्वभावांचे स्वतंत्र गुणधर्म कायम राहतात यावर आम्हीं विश्वास ठेवतो. आम्हीं विश्वास ठेवतो की दोन्हीं स्वभावांचे गुणधर्म येशू ख्रिस्त या एका व्यक्तीचे आहेत.[5]

आम्हीं हे नाकारतो की येशू ख्रिस्ताच्या मानवी स्वभावात दैवी गुणधर्म आहेत किंवा त्यात दैवी स्वभाव असू शकतो. आम्हीं हे नाकारतो की दैवी स्वभाव, मानवी स्वभावाशी आपल्या दैवी गुणधर्मांसह संपर्कात (आदान-प्रदान, पार करणे) असतो. आम्हीं हे नाकारतो की पुत्राने देह धारणात त्याचे काही दैवी गुणधर्म बाजूला ठेवले किंवा सोडून दिले.

*कलम ६*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त देवाचे दृश्यमान स्वरूप आहे, की तो खऱ्या मनुष्यत्वाचा मानक आहे, आणि हे की आमच्या मुक्तीमध्ये आम्हीं शेवटी त्याच्या प्रतिमेप्रमाणे होणार आहोत.[6]

आम्हीं हे नाकारतो की येशू ख्रिस्त पूर्ण मनुष्य नव्हता, की तो केवळ मनुष्य असल्यासारखा दिसत होता, किंवा त्याच्यामध्ये यथोचित मानवी आत्मा नव्हता. आम्हीं हे नाकारतो की येशू ख्रिस्ताच्या एकाच व्यक्तिमत्वामध्ये दैवी व मानवी स्वभावांच्या सत्वांच्या ऐक्यामध्ये पुत्राने मानवी स्वभावाऐवजी मानवी व्यक्तीत्व धारण केले होते.

---

4 शिमोन पेत्रानें उत्तर दिलें, "आपण ख्रिस्त, जिवंत देवाचे पुत्र आहां." येशूनें त्याला म्हटलें, "शिमोन बार्योना, धन्य तुझी; कारण मांस व रक्त यांनीं नाहीं, तर माझ्या स्वर्गांतील पित्यानें हें तुला प्रगट केलें आहे (मत्तय १६:१६-१७); हे संदर्भ देखील पाहाः लूक १:३५,४३; योहान १:१-३; ८:५८; १७:५; प्रे. कृ. २०:२८; रोम. १:३; ९:५; २ करिंथ. ८:९; कलस्सै. २:९; १ तीमथ्य. ३:१६; १ पेत्र. ३:१८; प्रकटी. १:८,१७; २२:१३.

5 असली जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूमध्यें होती ती तुम्हांमध्यें ही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवासमान असणें हा लाभ असा त्यानें मनिला नाहीं, तर त्यानें स्वतःला रिक्त केलें, म्हणजे मनुष्याच्या प्रतिमेचें होऊन दासाचें स्वरूप धारण केलें. (फिलिप्पै. २:५-७) हे संदर्भ देखील पाहाः मत्तय ९:१०; १६:१६; १९:२८; योहान १:१; ११:२७,३५; २०:२८; रोम. १:३-४; ९:५; इफिस. १:२०-२२; कलस्सै. १:१६-१७; २:९-१०; १ तीमथ्य. ३:१६; हिब्रू. १:३, ८-९; १ पेत्र. ३:१८; २ पेत्र. १:१.

6 तो अदृश्य देवाची प्रतिमा आहे; तो सर्व उत्पत्तींत ज्येष्ठ आहे; कारण आकाशांत व पृथ्वीवर असलेलें, दृश्य व अदृश्य असलेलें; राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले; तें सर्व त्याच्यामध्यें उत्पन्न झालें; सर्व त्याच्या द्वारें व त्याच्यासाठीं उत्पन्न झालें. (कलस्सै. १:१५-१६). हे संदर्भ देखील पाहाः रोम. ८:२९; २ करिंथ. ४:४-६; इफिस. ४:२०-२४; इब्री. १:३-४;





*कलम ७*

आम्हीं विश्वास धरतो की वास्तविक मनुष्य म्हणून, येशू ख्रिस्त त्याच्या दीनतेच्या स्थितीत असताना त्याला सर्व नैसर्गिक मर्यादा होत्या आणि त्याच्यामध्ये मानवी स्वभावाची सर्व सामान्य दुर्बळता होती. आम्हीं असा विश्वास ठेवतो की तो सर्व बाबतीत आमच्यासारखा बनला होता, तरीही तो पापरहित होता.[7]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताने पाप केले. आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताने खरोखर दुःख, मोह किंवा त्रास अनुभवला नाही. आम्हीं हे नाकारतो की पाप खऱ्या मनुष्यत्वासाठी जन्मजात आहे किंवा येशू ख्रिस्ताचा निर्दोषपणा त्याच्या वास्तविक मानव असण्याशी विसंगत आहे.

*कलम ८*

आम्हीं विश्वास ठेवतो की ऐतिहासिक येशू ख्रिस्ताची, पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, अद्भुतरित्या गर्भधारणा झाली आणि त्याचा जन्म कुमारी मरीयेपासून झाला. आम्हीं चाल्सेडोनियन विश्वासअंगीकारानुसार असा विश्वास धरतो की मरीयेला देवाची आई म्हटले जाते हे योग्यच आहे कारण तिने जन्म दिलेले मूल हा देवाचा देहधारी पुत्र आणि पवित्र त्रैक्यातील दुसरी व्यक्ती आहे.[8]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताला त्याचा दैवी स्वभाव मरीयेकडून मिळाला होता किंवा त्याचा निष्पापपणा त्याला तिच्यापासून प्राप्त झाला होता.

---

7 यास्तव त्याला सर्व प्रकारें आपल्या बंधुवर्गासारखें होणें अगत्य होतें, ह्यासाठीं कीं, लोकांच्या पापांचें प्रायश्चित्त करण्याकरीतां आपण देवसंबंधीं गोष्टींविषयीं दयाळू व विश्वासू मुख्य याजक व्हावें. कारण ज्या अर्थी त्यानें स्वतः परीक्षेचें दुःख भोगिलें त्या अर्थी ज्यांची परीक्षा होते त्यांना साहाय्य करावयास तो समर्थ झाला आहे. (इब्री. २:१७-१८) हे संदर्भ देखील पाहाः मिखा २:५; लूक २:५२; रोम. ८:३; गलती. ४:४; फिलिप्पै. २:५-८; इब्री. ४:१५.

8 नंतर सहाव्या महिन्यांत देवानें गालीलांतील नासरेथ नामें नगरास एका कुमारीकडे गब्रीएल देवदूताला पाठविलें. ती दाविदाच्या घराण्यांतील योसेफ नामें पुरुषाला वाग्दत्त होती; त्या कुमारीचें नांव मरीया होतें. (लूक १:२६-२७). हे संदर्भ देखील पाहाः मत्तय १:२३; २:११; लूक १:३१,३५,४३; रोम. १:३;गलती. ४:४.

*कलम ९*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त हा शेवटचा आदाम आहे, जो त्याच्या नेमून दिलेल्या कार्यात त्या प्रत्येक ठिकाणी यशस्वी झाला ज्या ठिकाणी पहिला आदाम अपयशी झाला होता, आणि हे की येशू ख्रिस्त त्याचे लोक जे ख्रिस्ताचे शरीर आहे त्यांचे मस्तक आहे.[9]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताने पतित मानवी स्वभाव घारण केला किंवा वारशाने मूळ पापाचा भागीदार बनला.

*कलम १०*

आम्हीं येशू ख्रिस्ताच्या सक्रीय आणि निश्चेष्ट आज्ञाधारकपणावर विश्वास ठेवतो, की त्याच्या परिपूर्ण जीवनात त्याने आमच्या वतीने नियमशास्त्राच्या नीतिमत्वाविषयीच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या आणि हे की वधस्तंभावरील त्याच्या मृत्यूद्वारे त्याने आमच्या पापांची शिक्षा भोगली.[10]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्त कोणत्याही स्तरावर देवाच्या नियमांचे पालन करण्यात किंवा पूर्ण करण्यात अयशस्वी ठरला. आम्हीं नाकारतो की त्याने दहा आज्ञांमध्ये सारांशीत नैतिक नियमशास्त्र रद्द केलें.

9 ह्या प्रकारें एका मनुष्याच्याद्वारें पाप जगांत आलें आणि पापाच्या द्वारें मरण आलें आणि सर्वांनीं पाप केल्यावरून सर्व मनुष्यांत मरण पसरलें. पाप नियमशास्त्रापूर्वी जगांत होतेंच; पण नियमशास्त्र नसलें म्हणजे पाप मोजण्यांत येत नाहीं. तथापि आदामापासून मोशापर्यंत, ज्यांनीं आदामाच्या उल्लंघनाच्या प्रकाराप्रमाणें पाप केलें नाहीं त्यांजवरहि मरणानें राज्य केलें; तो तर, तो जो येणार होता त्याची प्रतिमा होता. तरी पण जशी अपराधाची गोष्ट तशी कृपादानाची नाहीं; कारण ह्या एकाच्या अपराधानें बहुत माणसें मरण पावलीं, तर देवाची कृपा आणि तो एक पुरुष येशू ख्रिस्त याच्या कृपेचें दान हीं बहुत जणांकरितां विशेषेंकरून विपुल झालीं. पाप केलेल्या एका इसमाच्या द्वारें जसें झालें तसें दानाचें होत नाहीं; कारण ज्या न्यायाचा परिणाम दंडाज्ञा तो एकावरून झाला, पण ज्या कृपादानाचा परिणाम नीतिमान् ठरविलें जाणें असा आहे तें बहुत अपराधांवरून झालें. त्या एकाच्या अपराधानें, त्या एकाच्या द्वारें, मरणाचें राज्य चालू झालें; तर ज्यांस कृपा व नीतिमत्वाचें दान यांची विपुलता मिळते ते विशेषेंकरून त्या एका येशू ख्रिस्ताच्या द्वारें जीवनांत राज्य करितील. तर मग जसा एका अपराधानें सर्व मनुष्यांवर दंडाज्ञेचा परिणाम झाला, तसा नीतिमान् ठरविलें जाण्याच्या एका ठरावानें सर्व मनुष्यांवर जीवनदायी नीतिमत्त्व मिळणें हा परिणाम झाला. जसें त्या एका मनुष्याच्या आज्ञाभंगानें बहुत जण पापी ठरले, तसें ह्या एकाच्या आज्ञापालनानें बहुत जण नीतिमान् ठरतील. शिवाय नियमशास्त्राचा प्रवेश झाला तो अपराध् वाढण्यास साधनीभूत झाला; तरी जेथें पाप वाढलें तेथें कृपा फारच विपुल झाली; यासाठीं कीं जसें पापानें मरणाच्या योगानें राज्य केलें, तसें कृपेनें नीतिमत्वाच्या योग सर्वकालच्या जीवनासाठीं येशू ख्रिस्त आपला प्रभु याच्या द्वारें राज्य करावें. (रोम. ५:१२-२१)

10 जसें त्या एका मनुष्याच्या आज्ञाभंगानें बहुत जण पापी ठरले, तसें ह्या एकाच्या आज्ञापालनानें बहुत जण नीतिमान् ठरतील. (रोम. ५:१९). हे संदर्भ देखील पाहा: मत्तय ३:१५; योहान ८:२९; २ करिंथ. ५:२१; फिलिप्पै. २:८; इब्री. ५:८.





*कलम ११*

आम्हीं विश्वास ठेवतो की वधस्तंभावर येशू ख्रिस्ताने त्याच्या लोकांच्या पापांसाठी, त्यांच्या बदली प्रतिस्थापन बनून दंडात्मक प्रायश्चित म्हणून स्वतःला अर्पण केले, देवाचा क्रोध शांत केला आणि देवाच्या न्यायाचे समाधान केले आणि पाप, मृत्यू आणि सैतानावर विजय मिळविला.[11]

आम्हीं हे नाकारतो की येशू ख्रिस्ताचा मृत्यू ही सैतानाला दिलेली खंडणी होती. आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताचा मृत्यू केवळ एक उदाहरण, केवळ सैतानावर विजय किंवा देवाच्या नैतिक राज्यकारभाराचे केवळ एक प्रदर्शन होते.

*कलम १२*

आम्हीं दुहेरी अध्यारोपाच्या सिद्धांतावर (अध्यारोप म्हणजे, आमची पापे ख्रिस्तावर टाकण्यात आली, आणि त्याचे नीतिमत्व आमच्यावर टाकण्यात आले) विश्वास ठेवतो, की आमचे पाप येशू ख्रिस्तावर लादले गेले आणि त्याच्यावर विश्वास ठेवल्याने त्याचे नीतिमत्व आम्हांला दिले जाते.[12]

आम्हीं नाकारतो की देव न्याय न करता पापाकडे दुर्लक्ष करतो. आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताचा सक्रिय आज्ञाधारकपणा आमचा आज्ञाधारकपणा म्हणून गणिला जात नाही.

*कलम १३*

आम्हीं विश्वास ठेवोत की तिसऱ्या दिवशी येशू ख्रिस्त मेलेल्यांतून उठला आणि तो देहात अनेकांना दिसला.[13]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताचा मृत्यू केवळ भास आहे किंवा केवळ त्याचा आत्मा जिवंत राहिला किंवा त्याचे पुनरुत्थान केवळ त्याच्या अनुयायांच्या अंतःकरणात झाले.

11 त्याच्या रक्तानें विश्वासाच्या द्वारें प्रायश्चित्त होण्यास देवानें त्याला पुढें ठेविलें, यासाठीं कीं पूर्वी झालेल्या पापांची देवाच्या सहनशीलतेनें उपेक्षा झाल्यामुळें त्यानें आपलें नीतिमत्व व्यक्त करावें; आपलें नीतिमत्व सांप्रतकाळीं असें दाखवावें कीं आपण नीतिमान् असावें आणि येशूवर विश्वास ठेवणाऱ्याला नीतिमान् ठरविणारें असावें. (रोम. ३:२५-२६). हे संदर्भ देखील पाहा: यशया ५३; रोम. ५:६,८,१५; ६:१०; ७:४; ८:३४; १४:९,१५; १ करिंथ. १५:३; इफिस. ५:२; १ थेस्सलनी. ५:१०; २ तीमथ्य. २:११; इब्री. २:१४,१७; ९:१४-१५; १०:१४; १ पेत्र. २:२४; ३:१८; १ योहान २:२; ३:८; ४.

12 ज्याला पाप ठाऊक नव्हतें त्याला त्यानें तुमच्याआमच्याकरितां पाप असें केलें; यासाठीं कीं आपण त्याच्याठायीं देवाचे नीतिमत्त्व असें व्हावें. (२ करिंथ. ५:२१). हे संदर्भ देखील पाहा: मत्तय ५:२०; रोम. ३:२१-२२; ४:११; ५:१८; १ करिंथ. १:३०; २ करिंथ. ९:९; इफिस. ६:१४; फिलिप्पै. १:११; ३:९; इब्री. १२:२३.

13 मला जें सागण्यांत आलें तें मीं तुम्हांस सांगून दिलें, त्यापैकीं मुख्य हें कीं धर्मशास्त्राप्रमाणें ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; धर्मशास्त्राप्रमाणें तिसऱ्या दिवशीं उठविला गेला; आणि तो केफाला, मग बारा जणांला दिसला. (१ करिंथ. १५:३-५). हे संदर्भ देखील पाहा: यशया ५३; मत्तय १६:२१; २६:३२; २८:१-१०; योहान २१:१४; प्रे. कृ. १:९-११; २:२५, ३२; ३:१५, २६; ४:१०; ५:३०; १०:४०; रोम. ४:२४-२५; ६:९-१०; इफिस. ४:८-१०.

*कलम १४*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त त्याच्या उत्कर्षाच्या अवस्थेत पुनरुत्थानाचे प्रथम फळ आहे, की त्याने पाप आणि मृत्यू यांवर विजय मिळविला आहे, आणि हे की त्याच्याशी एकरूप झाल्याने आमचे ही पुनरुत्थान होईल.[14]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताचे गौरवी पुनरुत्थित शरीर बागेतील कबरेत ठेवलेल्या शरीरापेक्षा पूर्णपणे वेगळे होते. आम्हीं नाकारतो की आमचे पुनरुत्थान हे आमच्या शरीराचे नसून केवळ आमच्या आत्म्यांचे पुनरुत्थान आहे.

*कलम १५*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्ताचे देवाच्या उजवीकडे असलेल्या त्याच्या स्वर्गीय सिंहासनावर स्वर्गारोहण झाले, की तो आता राजा म्हणून राज्य करत आहे, आणि तो सामर्थ्य आणि वैभवात सदृश्य असा परत येणार आहे.[15]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताने त्याच्या परत येण्याचा समय किंवा घटका ह्याविषयी चुकीचे अनुमान लाविले.

*कलम १६*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्ताने पेन्टेकॉस्टच्या दिवशी त्याचा आत्मा ओतला आणि वर्तमान समयी तो सर्व गोष्टींवर राज्य करत आहे, त्याच्या लोकांसाठी मध्यस्थी करत आहे आणि त्याची मंडळी उभारत आहे, जिचा तो एकमेव मस्तक आहे.[16]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताने रोमच्या बिशपला त्याचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त केले आहे, किंवा येशू ख्रिस्ताशिवाय इतर कोणी व्यक्ती मंडळीचे मस्तक असू शकतो.

---

14 तरीपण ख्रिस्त महानिद्रा घेतलेल्यांतले प्रथम फळ असा मेलेल्यांतून उठविला गेला आहेच. “अरे मरणा, तुझा विजय कोठें? अरे मरणा, तुझी नांगी कोठें?” (१ करिंथ. १५:२०,५५) हे संदर्भ देखील पाहा: रोम. ५:१०; ६:४,८,११; १०:९; १ करिंथ. १५:२३; २ करिंथ. १:९; ४:१०-११; इफिस. २:६; कलस्सै. २:१२; २ थेस्सलनी. २:१३; इब्री. २:९,१४; १ योहान ३:१४; प्रकटी. १४:४; २०:१४.

15 यास्तव ते एकत्र असतांना त्यांनी त्याला विचारिलें, प्रभो, या वेळेस आपण इस्त्राएलाचें राज्य पुनःस्थापीत करणार काय? तो त्यांस म्हणाला, जे काल व प्रसंग पित्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत ते ओळखणें तुम्हांकडे नाहीं. पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हां तुम्हांस सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमांत, सर्व यहूदीयांत, शोमरोनांत व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्हीं माझे साक्षी व्हाल. असें सांगितल्यावर त्यांच्या डोळयांदेखत तो वर घेतला गेला; आणि मेघानें त्याला त्यांच्या दृष्टिआड केलें. तो जात असतां ते आकाशाकडे निरखून पाहत होते, तेव्हां पाहा, शुभ्र वस्त्रें परिधन केलेलें दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे होते, ते म्हणाले, अहो गालीलकरांनो, तुम्हीं आकाशाकडे का पाहत उभे राहिलां? तुम्हांपासून वर आकाशांत घेतला गेला आहे, तोच येशू, जसें तुम्हीं त्याला आकाशांत जातां पाहिलें, तसाच येईल. (प्रे. कृ. १:६-११)

16 त्यानें सर्व कांहीं त्याच्या पायांखालीं घातलें, आणि त्यानें सर्वांवर मस्तक असें व्हावें म्हणून त्यास मंडळीला दिलें. (इफिस. १:२२) हे संदर्भ देखील पाहा: प्रे. कृ. २:३३; १ करिंथ. ११:३-५; इफिस. ४:१५; ५:२३; कलस्सै. १:१८.





*कलम १७*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त सर्व लोकांचा न्याय करण्यासाठी पुन्हा गौरवात येणार आहे आणि शेवटी त्याच्या सर्व शत्रूंचा नाश करणार आहे, मृत्यूचा नाश करणार आहे आणि नवा स्वर्ग आणि नवी पृथ्वी निर्माण करून त्यामध्ये तो नीतिमत्तेने राज्य करेल.[17]

आम्हीं नाकारतो की इ.स. ७० मध्ये येशू ख्रिस्ताचे शेवटचे आगमन होऊन गेले आणि हे की त्याचे परत येणे आणि त्याशी संबंधित असलेल्या घटनांकडे आम्हीं प्रतीकात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे.

*कलम १८*

आम्हीं विशास ठेवतो की प्रभु येशू ख्रिस्ताच्या नावावर जे विश्वास ठेवतात त्यांना त्याच्या सार्वकालिक राज्यात घेतले जाईल, परंतु जे त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत त्यांना नरकात अनंतकाळापर्यंत जाणीवपूर्वक शिक्षा भोगावी लागेल.[18]

आम्हीं नाकारतो की या जगात जन्मास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे तारण होईल. आम्हीं नाकारतो की जे येशू ख्रिस्तावर विश्वास न ठेवता मरतात त्यांचा सर्वनाश त्यांच्या आत्म्यांचे सर्वकाळासाठी अस्तित्व नाहीसे करून केला जाईल.

*कलम १९*

आम्हीं विशास ठेवतो की जगाच्या स्थापनेपूर्वी जे येशू ख्रिस्तामध्ये निवडले गेले आहेत आणि त्याच्यावरील विश्वासाने जे त्याच्याशी जोडले गेले आहेत ते सर्व त्याच्याबरोबर आणि एकमेकांच्या सहवासाचा आनंद घेतात. आम्हीं विशास ठेवतो की येशू ख्रिस्तामध्ये आम्हीं प्रत्येक आध्यात्मिक आशीर्वादाचा आनंद घेतो, ज्यात नीतिमान ठरविले जाणे, दत्तकपणाचा हक्क, पवित्रीकरण आणि गौरव यांचा समावेश आहे.[19]

आम्हीं हे नाकारतो की येशू ख्रिस्त आणि त्याचे तारणाचे कार्य यांना वेगळे केले जाऊ शकते. आम्हीं हे नाकारतो की आम्हीं स्वतः येशू ख्रिस्ताशिवाय येशू ख्रिस्ताच्या तारणाच्या कार्यात सहभागी होण्यास सक्षम आहोत. आम्हीं हे नाकारतो की आम्हीं येशूचे शरीर म्हणजे ख्रिस्ती मंडळीशी एकरूप न होता येशू ख्रिस्ताशी एकरूप होऊ शकतो.

---

17 त्यानें आम्हांस आज्ञा केली कीं लोकांस उपदेश करा व साक्ष द्या कीं देवानें नेमलेला जीवंतांचा व मेलेल्यांचा असा न्यायाधीश हाच आहे. (प्रे. कृ. १०:४२). हे संदर्भ देखील पाहा: योहान १२:४८; १४:३; प्रे. कृ. ७:७; १७:३१; २ तीमथ्य. ४:१,८.

18 मनुष्याचा पुत्र आपल्या देवदूतांस पाठवील आणि ते सर्व अडखळविणाऱ्यांस व अधर्म करणाऱ्यांस त्याच्या राज्यांतून जमा करून त्यांस अग्नीच्या भट्टीत टाकितील; तेथें रडणें व दांतखाणें चालेल. तेव्हां धार्मिक जन आपल्या पित्याच्या राज्यांत सूर्यासारिखे प्रकाशतील. ज्याला कान आहेत तो ऐको. (मत्तय २१:४१-४३) हे संदर्भ देखील पाहा: यशया २५:६-९; ६५:१७-२५; ६६:२१-२३; दनिएल ७:१३-१४; मत्तय ५:२९-३०; १०:२८; १८:८-९; मार्क ९: ४२-४९; लूक १:३३; १२:५; योहान १८:३६; कलस्सै. १:१३-१४; २ थेस्सलनी. १:५-१०; २ तीमथ्य. ४:१,१८; इब्री. १२:२८; २ पेत्र. १: ११; २:४; प्रकटी. २०:१५.

19 कारण आपण यहूदी असूं किंवा हेल्लेणी असूं ,दास असूं किंवा स्वतंत्र असूं आपणां सर्वांना एका आत्म्यांत एक शरीर होण्यासाठीं बाप्तिस्मा मिळाला आहे आणि आपण सर्व एकाच आत्म्यानें संचरित झालों आहों. (१ करिंथ. १२:१३) हे संदर्भ देखील पाहा: योहान १४:२०; १५:४-६; रोम. ६:१-११; ८:१-२; १२:३-५; १ करिंथ. १:३०-३१; ६:१५-२०; १०:१६-१७; १२:२७; २ करिंथ. ५:१७-२१; गलती. ३:२५-२९; इफिस. १:३-१०, २२-२३; २:१-६; ३:६; ४:१५-१६; ५:२३,३०; कलस्सै. १:१८; २:१८-१९.

*कलम २०*

आम्हीं केवळ विश्वासाने नीतिमान ठरविले जाण्याच्या सिद्धांतावर विश्वास ठेवतो, आणि हे की देव आम्हांला आमच्या स्वतःच्या वैयक्तिक गुणवत्तेशिवाय किंवा कार्यांशिवाय, केवळ येशू ख्रिस्त आणि त्याच्या कार्यावर विश्वासाच्या द्वारे, केवळ त्याच्या कृपेच्या कृतीद्वारे नीतिमान घोषित करतो. आम्हीं विश्वास ठेवतो की केवळ विश्वासाने नीतिमान ठरविले जाण्याचा सिद्धांत नाकारणे म्हणजे सुवार्ता नाकारण्यासारखे आहे.[20]

आम्हीं नाकारतो की आम्हीं आमच्यामध्ये कोणत्याही माध्यमातून कृपा मिश्रित केली गेल्यामुळे नीतिमान ठरतो. आम्हीं नाकारतो की आम्हीं जेव्हा आंतरिकरित्या नीतिमान बनतो तेव्हा आम्हांला नीतिमान ठरवले जाते हे आम्हीं नाकारतो. आम्हीं हे नाकारतो की हे नीतिमान ठरविले जाणे, आता किंवा कधीही आमच्या विश्वासूपणावर आधारित असेल.

*कलम २१*

आम्हीं पवित्रीकरणाच्या सिद्धांतावर विश्वास ठेवतो, की देव पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, येशू ख्रिस्ताच्या कार्यावर आधारित, पापाच्या राज्य करणाऱ्या शक्तीपासून सोडवितो, आम्हांला वेगळे करतो आणि आम्हांला अंशा अंशाने त्याच्या पुत्राच्या प्रतिमेमध्ये घडवून पवित्र करतो. आम्हीं विश्वास ठेवतो की पवित्रीकरण हे देवाच्या कृपेचे कार्य आहे आणि ते नीतिमान ठरविले जाण्याच्या प्रक्रियेपेक्षा वेगळे असले तरी ते त्या प्रक्रियेशी अविभाज्यपणे जोडलेले आहे. आम्हीं विश्वास ठेवतो की, पवित्रीकरणाच्या या दैवी कार्यात आम्हीं केवळ निष्क्रीय नाही, तर पापाला मरण्यासाठी आणि प्रभूच्या आज्ञेत जीवन जगण्यासाठी उपलब्ध असलेल्या कृपेच्या साधनांचा उपयोग करून सतत प्रयत्नशील राहण्यास आम्हीं जबाबदार आहोत.[21]

आम्हीं नाकारतो की पवित्रीकरणाची प्रक्रिया चालू असताना येशू ख्रिस्ताशी ऐक्य झाल्याचे फळ ताबडतोब आपल्या जीवनात दिसून न येताच आपण नीतिमान ठरविले जातो. आम्हीं नाकारतो की आमची सत्कृत्यें, येशू ख्रिस्तामध्ये देवाला मान्य असली तरी ती आपल्याला नीतिमान ठरविण्यास योग्य बनवतात. आम्हीं नाकारतो की या जीवनात आपल्यावर पापाचे प्रभुत्व नसले तरी, आंतरिक पापाशी आपला संघर्ष थांबेल.

20 यास्तव आपण विश्वासानें नीतिमान् ठरविलेले आहों म्हणून आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारें आपणांस देवाबरोबर असलेल्या शांतीचा लाभ घडो (रोम. ५:१). हे संदर्भ देखील पाहा: लूक १८:१४; रोम. ३:२४; ४:५; ५:१०; ८:३०; १०:४, १०; १ करिंथ. ६:११; २ करिंथ. ५:१९, २१; गलती. २:१६-१७; ३:११, २४; ५:४; इफिस. १:७; तीत. ३:५,७.

21 आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा पिता जो देव तो धन्यवादित असो; त्यानें स्वर्गातील सर्व आध्यात्मिक वर देऊन आपणाला ख्रिस्तामध्यें धन्य केलें आहे; आपण प्रेमामध्यें त्याच्या दृष्टीनें पवित्र व निर्दोष व्हावें, म्हणून त्यानें सृष्टीच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्तामध्यें निवडिलें (इफिस. १:३-४) हे संदर्भ देखील पाहा: योहान १७:१७; प्रे. कृ. २०:३२; रोम. ६:५-६, १४; ८:१३; १ करिंथ. ६:११; २ करिंथ. ७:१; गलती. ५:२४; इफिस. ३:१६-१९; ४:२३-२४; फिलिप्पै. ३:१०; कलस्सै. १:१०-११; २ थेस्सलनी. २:१३; इब्री. १२:१४.





*कलम २२*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त हा देव आणि त्याचे लोक यांच्यामधील एकमेव मध्यस्थ आहे. आम्हीं येशू ख्रिस्ताची प्रेषित, याजक, आणि राजा म्हणून त्याच्या दीनतेच्या स्थितीत आणि त्याच्या गौरवी स्थितीत असलेल्या त्याच्या मध्यस्थाच्या भूमिकेवर विश्वास ठेवतो. येशू ख्रिस्ताला ही मध्यस्थाची जबाबदारी पार पाडण्यासाठी पित्याने पाचारण केले होते आणि त्यासाठी त्याला पवित्र आत्म्याद्वारे अभिषेक करण्यात आला होता यावर आम्हीं विश्वास ठेवतो.[22]

आम्हीं नाकारतो की देवाचे इतर अवतार होऊन गेले किंवा भविष्यात होतील किंवा प्रभू येशू ख्रिस्ताशिवाय इतर कोणीही तारणासाठी मध्यस्थ आहेत किंवा भविष्यात असतील. फक्त येशू ख्रिस्ताशिवाय इतर कोणत्याही प्रकारे तारण होऊ शकते हे आम्हीं नाकारतो.

*कलम २३*

आम्हीं विश्वास ठेवतो की देवाचा सर्वोच्च संदेष्टा या नात्याने येशू ख्रिस्त भविष्यवाणीचा विषय आणि केंद्रस्थान होता. आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्ताने देवाची इच्छा प्रकट करून तिची घोषित केली, भविष्यातील घटनांची भविष्यवाणी केली आणि तो स्वतःच देवाच्या अभिवचनांची पूर्तता आहे.[23]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताने कधी खोटी भविष्यवाणी केली किंवा खोटे शब्द उच्चारले, किंवा त्याच्याबद्दल करण्यात आलेल्या भविष्यवाण्या पूर्ण करण्यात तो अयशस्वी ठरला किंवा भविष्यात ठरेल.

22 कारण एकच देव आहे, आणि देव व मनुष्यें यांमधील ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. (१ तीमथ्य. २:५) हे संदर्भ देखील पाहा: ईयोब ३३:२३-२८; लूक १:३३; योहान १:१-१४; १४:६; प्रे. कृ. ३:२२; कलस्सै. १:१५; इब्री. १:१-४; ५:५-६; ९:१५; १२:२४.

23 बंधुजनहो मी हें जाणून आहें कीं तुम्हीं हें अज्ञानामुळें केलें तसेंच तुमच्या अधिकाऱ्यांनीहि केलें; परंतु आपल्या ख्रिस्तानें दुःख सहन करावें म्हणून देवानें सर्व संदेष्ट्यांच्या मुखानें पूर्वी सांगितलें होतें तें त्यानें त्याप्रमाणें पूर्ण केलें. यास्तव तुमचीं पापें पुसून टाकिलीं जावीं म्हणून पश्चाताप करा व मागें वळा अशासाठीं कीं विश्रांति मिळण्याचे समय प्रभूजवळून यावे; आणि तुम्हांकरितां पूर्वी नेमिलेला येशू ख्रिस्त याला त्यानें पाठवावें; ज्याविषयीं आरंभापासून देवानें आपल्या पवित्र संदेष्ट्यांच्या मुखानें सांगितलें त्या सर्वांचें यथास्थित होण्याच्या काळापर्यंत त्याला स्वर्गांत राहणें प्राप्त आहे. मोशानेंहि म्हटलें प्रभु देव माझ्यासारिखा संदेष्टा तुम्हांसाठीं तुमच्या भावांमधून उठवील; तो जें कांहीं तुम्हांला सांगेल तें सर्व त्याचें ऐका (प्रे. कृ. ३:१७-२२). हे संदर्भ देखील पाहा: मत्तय २०:१७; २४:३; २६:३१,३४,६४; मार्क १:१४-१५; लूक ४:१८-१९, २१; योहान १३:३६; २१:२२; १ करिंथ. १:२०; इब्री. १:२; प्रकटी. १९:१०.

*कलम २४*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त हा मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणें आमचा महान महायाजक आहे, त्याने आमच्या वतीने स्वतःचे परिपूर्ण बलिदान केले आणि पित्यासमोर आमच्यासाठी मध्यस्थी करत आहे. असा आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त हा सर्वोच्च प्रायश्चित यज्ञाचा विषय आणि केंद्रस्थान दोन्ही आहे.[24]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्त, जो लेवी वंशाचा नसून यहूदा वंशाचा आहे, तो आमचा याजक म्हणून सेवा करण्यास अपात्र आहे. आम्हीं नाकारतो की तो अर्पण आणि याजक म्हणून उपासनेमध्ये, अगदी रक्त न सांडता देखील, सतत स्वतःचे अर्पण करतो. आम्हीं नाकारतो की तो केवळ स्वर्गातच याजक बनला आणि पृथ्वीवर असताना तो याजक नव्हता.

*कलम २५*

आम्हीं विश्वास ठेवतो की राजा या नात्याने, येशू ख्रिस्त सर्व पृथ्वीवरील आणि अलौकिक शक्तींवर आता आणि सदासर्वकाळ राज्य करतो.[25]

आम्हीं नाकारतो की येशू ख्रिस्ताचे राज्य हे या जगाचे केवळ राजकीय राज्य आहे. आम्हीं नाकारतो की पृथ्वीवरील राज्यकर्ते त्याला हिशोब द्यावयास जबाबदार नाहीत.

24 खऱ्या गोष्टीच्या नमुन्यासारखें हातांनीं केलेलें पवित्रास्थान यांत ख्रिस्त गेला नाहीं तर आपल्यासाठीं देवासन्मुख उभा राहण्यास स्वर्गांत गेला; आणि जसा प्रमुख याजक प्रतिवर्षी दुसऱ्याचें रक्त घेऊन परमपवित्रास्थानांत जातो तसा तो स्वतःला वारंवार अर्पण करावयास गेला नाहीं; तो गेला असता तर जगाच्या स्थापनेपासून त्याला वारंवार दुःख सोसावें लागलें असतें; पण तो युगांच्या समाप्तीस स्वतःच्या यज्ञानें पापें नाहींतशीं करण्यासाठीं एकदाच प्रकट झाला आहे. ज्या अर्थी मनुष्यांस एकदाच मरणें व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेविलें आहे त्याअर्थी ख्रिस्त बहुतांचीं पापें स्वतःवर घेण्यास एकदाच अर्पिला गेला आणि जे त्याची वाट पाहतात त्यांस तारणासाठीं पापविरहित असा दुसऱ्यानें दिसेल. (इब्री. ९:२४-२८). हे संदर्भ देखील पाहाः योहान १:३६; १९:२८-३०; प्रे. कृ. ८:३२; १ करिंथ. ५:७; इब्री. २:१७-१८; ४:१४-१६; ७:२५; १०:१२,२६; १ पेत्र. १:१९; प्रकटी. ५:६,८, १२-१३; ६:१,१६; ७:९-१०,१४,१७; ८:१; १२:११; १३:८; १५:३.

25 कारण आपल्या पायांखालीं सर्व शत्रू ठेवीपर्यंत त्याला राज्य केलें पाहिजे (१ करिंथ. १५:२५). हे संदर्भ देखील पाहाः स्त्रोत्र. ११०; मत्तय २८:१८-२०; लूक १:३२; २:११; प्रे. कृ. २:२५,२९,३४; ४:२५; १३:२२,३४,३६; १५:१६; रोम. १:३; २ तीमथ्य. २:८; इब्री. ४:७; प्रकटी. ३:७; ५:५; २२:१६.





*कलम २६*

आम्हीं विश्वास ठेवतो की येशू ख्रिस्त जेव्हा त्याच्या सर्व शत्रूंवर विजय मिळवेल तेव्हा तो त्याचे राज्य पित्याकडे सोपवेल. आम्हीं विश्वास ठेवतो की नव्या स्वर्गात आणि नव्या पृथ्वीवर, देव त्याच्या लोकांसोबत असेल आणि विश्वासणारे येशू ख्रिस्ताला समोरासमोर पाहतील, त्याच्यासारखे बनतील आणि सर्वकाळासाठी त्याचा आनंद उपभोगतील.[26]

आम्हीं नाकारतो की मानवजातीसाठी इतर कोणतीही आशा किंवा केवळ येशू ख्रिस्ताशिवाय तारण होऊ शकेल असे कोणतेही नाव किंवा मार्ग अस्तित्वात आहे.

26 नंतर शेवट होईल तेव्हां सर्व अधिपत्य, सर्व अधिकार व सामर्थ्य हीं नाहींतशीं केल्यावर देवपित्याला तो राज्य सोपून देईल. कारण आपल्या पायांखाली सर्व शत्रु ठेवीपर्यंत त्याला राज्य केलें पाहिजे. शेवटला शत्रु जो मृत्यु तो नाहींसा केला जाईल. त्यानें सर्व वश करून याच्या पायांखालीं ठेविलें; परंतु सर्व वश केलें आहे असे जेव्हा म्हटलें तेव्हां ज्यानें त्याला सर्व वश करून दिलें तो अर्थातच बाहेर राहिला. त्याला सर्व कांहीं वश झालें असें जेव्हां होईल तेव्हां ज्यानें त्याला सर्व वश करून दिलें त्याला पुत्राहि स्वतः वश होईल; यासाठीं कीं देवानें सर्वात सर्व असें व्हावें. (१ करिंथ. १५:२४-२८). हे संदर्भ देखील पाहाः यशया ६५:१७; ६६:२२; फिलिप्पै. २:९-११; २ पेत्र. ३:१३; १ योहान ३:२-३; प्रकटी. २१:१-५; २२:१-५.

# स्पष्टीकरणात्मक निबंध

*आणि*

*उपयोगाच्यां*

*सूचना*

एक दिवस असा येईल ज्यात संपूर्ण पृथ्वी एकाच अंगीकाराचा नाद करेल : "येशू ख्रिस्त प्रभु आहे" (फिलिप्पै. २:११). हे छोटे वाक्य अर्थाने ओथंबून वाहत आहे. येशू हाच *ख्रिस्त* आहे असे म्हणणे म्हणजे तो "अभिषिक्त" आहे असे म्हणणे होय. म्हणजेच तो अभिवचन दिलेला आणि ज्याची लोक फार काळापासून वाट पाहत होते असा मसीहा आहे.

येशू ख्रिस्त हा *प्रभु* आहे असे म्हणणे म्हणजे तो खरोखर साक्षात परमेश्वर आहे असे म्हणणे होय. देह धारण एक विस्मयकारक चमत्कार आहे, एक थक्क करणारे रहस्य. देव देहधरी झाला. त्याला *येशू* म्हणणे म्हणजे तो एकच आणि एकमेव तारणारा आहे असे म्हणणे होय. तो त्याच्या लोकांना त्यांच्या पापांपासून तारण्याच्या विशिष्ट कार्यासाठी जगात आला (मत्तय १:२१).

"येशू ख्रिस्त प्रभु आहे" हा एक विश्वासांगीकार आहे - विश्वासाचे संक्षिप्त विधान. इंग्रजी शब्द क्रीड हा लॅटिन शब्द क्रेडो या शब्दावरून आला आहे, ज्याचा अर्थ "मी विश्वास ठेवतो" आहे. हा संक्षिप्त विश्वासांगीकार आपण ख्रिस्ताबद्दल काय विश्वास ठेवतो या विषयीची घोषणा करतो. काहींना वाटते की, १ तीमथ्य. ३:१६ हे वचन देखील एक विश्वासांगीकार असू शकते. दोन कारणे याकडे आपले लक्ष वेधतात. पहिले, पौल अशा रीतीने व्यक्त करतो, "खरोखरच मोठे, आम्हीं कबूल करतो". दुसरे, या वचनातील वाक्ये लयबद्ध आणि काव्यात्मकपणे व्यक्त केली आहेत. ही वाक्ये देहधारी ख्रिस्ताविषयी एक संक्षिप्त सारांश स्थापित करतात :

तो देहानें प्रकट झाला,
आत्म्याद्वारे निर्दोष ठरविला गेला,
देवदूतांच्या दृष्टीस पडला,
त्याची राष्ट्रांमध्ये घोषणा झाली,
जगात त्याच्यावर विश्वास ठेवण्यात आला,
तो गौरवात वर घेतला गेला. (१ तीमथ्य. ३:१६)

पवित्र शास्त्रात दिलेला नमुना महत्त्वाचा आहे. सुरुवातीच्या मंडळीने प्रशासकीय मंडळे स्थापन केली आणि विश्वासांगीकार तयार केले तेव्हा ते विश्वासाची कबुली देण्याची एखादी नवीन पद्धत तयार करत नव्हते. ते पवित्र शास्त्रानुसार स्थापित केलेली परंपराच पुढे चालवित होते.

जस-जशी आव्हाने उभी राहत गेली, सुरुवातीच्या मंडळीने एक ठाम भूमिका घेतली. तसेच, अनेकांच्या मते, सार्वजनिक उपासनेच्या गरजा किंवा शुद्ध उपासनेच्या इच्छेने सुद्धा मंडळीला विश्वासंगीकार लिहिण्यास प्रवृत्त केले. ही गोष्ट विशेषतः ख्रिस्ताच्या सिद्धांताबाबत खरी आहे. येशूच्या व्यक्तीत्वाचे आणि कार्याचे तात्विक सत्य हे शतकानुशतके ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेचे वैशिष्ट असत आले आहे.

नव्या कराराच्या लेखकांनी स्वतः ख्रिस्ताची ओळख आणि कार्य यासंबंधीच्या खोट्या कल्पनांशी लढा दिला. मंडळीच्या सुरुवातीच्या शतकांमध्ये, विविध गटांनी ख्रिस्ताच्या खऱ्या मनुष्यपणाला आव्हान दिले. आभासवाद (डोसेटिस्ट) गटाने असा दावा केला की येशू मानव असल्याचा केवळ एक "आभास" होता (म्हणजे तो वास्तविक मानव नसून केवळ मानवासारखा दिसून आला). एरियसवादासारख्या इतर खोट्या शिक्षणांनीं ख्रिस्ताच्या खऱ्या परमेश्वरत्वाला आव्हान दिले. या खोट्या शिक्षणांनीं दावा केला की तो देव पित्यापेक्षा कमी होता. नंतरच्या गटांनी ख्रिस्ताचे खरे मनुष्यत्व आणि खरे दैवीपण, हे दोन स्वभाव त्याच्या एका व्यक्तीमध्ये कसे एकत्र आहेत हे व्यक्त करण्यात चूक केली. सुरुवातीच्या मंडळीने या आव्हानांना आणि त्रुटींना प्रतिसाद दिला आणि ख्रिस्ती धर्माच्या मध्यवर्ती सत्यांबद्दल पवित्र शास्त्राच्या शिकवणीचा सारांश देणाऱ्या सल्लागार समित्या आणि लिखित विश्वासांगीकार तयार केले. हे विश्वासांगीकार एक समृद्ध वारसा आहेत, जो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सोपविण्यात येतो. म्हणून आज, आमच्याकडे प्रेषितांचा मतांगीकार, नायसिन मतांगीकर आणि चालसेडोनियन विश्वासांगीकार यांचा अमूल्य साठा आहे. हे विश्वासांगीकार सीमा निश्चित करणारे आहेत, आणि ते परंपरागत ख्रिस्ती विश्वास आणि खोट्या शिकवनी यांच्यातील भेद स्पष्ट करतात.

या विश्वासांगीकारांनी मंडळीला पोलादी (सशक्त) बनविले आहे आणि देवाच्या कृपाळू आणि नियंत्रण करणाऱ्या हाताने, ख्रिस्ती लोकांना विश्वासूपणे सुवार्ता घोषित करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या टिकाऊ मूल्याची साक्ष हीच आहे की आजही उपासनेत ते म्हटले जातात. ते आपल्याला आठवण करून देतात की ख्रिस्त आपल्या ईश्वरविज्ञानशास्त्राच्या केंद्रस्थानी आणि आपल्या उपासनेच्या केंद्रस्थानी आहे. हे विश्वासांगीकार मंडळीला पाचारण करतात की तीने "पवित्र जनांच्या एकदाच स्वाधीन केलेल्या विश्वासाचें समर्थन करावे" (यहूदा १:३).

तरीही, हे विश्वासांगीकार ख्रिस्ताच्या कार्याकडे केवळ इशारा करतात. ते शुभवर्तमानाचे पूर्णपणे स्पष्टीकरण देत नाहीत. धर्मसुधार चळवळीच्या काळी सदृश्य ख्रिस्ती मंडळी खऱ्या अर्थाने वेगळी झाली. त्यात ख्रिस्ताचे कार्य हा मुख्य मुद्दा होता. अधिक स्पष्टपणे सांगायचे तर, केवळ विश्वासाने नीतिमान ठरवले जाण्याच्या सिद्धांतावरील वादविवाद हाच मुख्य वाद होता ज्यामुळे प्रोटेस्टंट धर्मसुधारणा घडून आली. येथे मंडळी प्रोटेस्टंट आणि रोमन कॅथलिक धर्माच्या धर्तीवर विभागली गेली. प्रोटेस्टंटवाद केवळ विश्वासाने *(सोला फिड)* नीतिमान ठरविले जाण्याच्या सिद्धांताचे समर्थन करतो, तर रोमन कॅथलिक धर्म, ट्रेंट धर्मपरिषदेच्या आदेशांचे पालन करून, केवळ विश्वासाने नीतिमान ठरविले जाण्याचा सिद्धांत नाकारतो, आणि त्याऐवजी विश्वास आणि कर्मांच्या संयोगाने नीतिमत्व मिळवण्याचा पर्याय निवडतो. धर्मसुधाराने आणखी एका मुद्द्यावर सुद्धा फरक प्रकट केला, तो म्हणजे, येशू ख्रिस्त हाच त्याच्या मंडळीचे आणि खरे तर सर्व गोष्टींवर सर्वोच्च आणि एकमेव मस्तक आहे.





सर्व मिळून, सुरुवातीच्या मंडळीचे विश्वव्यापी मंडळीविषयक हे विश्वासांगीकार आणि धर्मसुधारावर दिलेला भर मंडळीसाठी पवित्र शास्त्रानुसार विश्वसनीय शुभवर्तमान घोषित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करतात. हे विश्वासांगीकार आणि विविध धर्मसुधारांचे पापांगिकार आणि प्रश्नोत्तरावली विश्वासाचा सारांश देतात आणि विश्वास आणि शुभवर्तमानामध्ये स्पष्टता आणतात.

शब्द देही झालाः ख्रिस्तसिद्धांतावरील लिगोनियर विश्वासांगीकार नम्रपणे या पिढीच्या मंडळीला-आणि, देवाच्या आशीर्वादाने, येणाऱ्या पिढ्यांसाठी - ख्रिस्ताचे व्यक्तीत्व आणि त्याचे कार्य यांविषयी एक संक्षिप्त विधान प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करते जे भूतकाळातील अमूल्य सामग्रीतून व तसेच विश्वव्यापी मंडळीविषयक विश्वासांगीकार आणि धर्मसुधाराचे ईश्वरविज्ञानशास्त्र अशा दोन्हींमधून तयार करण्यात आलेले आहे.

बहुदा हा विश्वासांगीकार आणि त्याबरोबर असलेले विश्वास आणि नकाराचे सव्वीस लेख (कलम) ख्रिस्तसिद्धांताच्या महत्वाच्या मुद्यांवरील पुढील चर्चेसाठी मंडळयांसाठी प्रेरणादायक ठरू शकतो. कदाचित हा विश्वासांगीकार स्वतंत्रपणे मंडळीसाठी उपयुक्त ठरू शकतो. ह्या विश्वासांगीकाराला सार्वजनिक वाचनासाठी अनुकूल बनवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला गेला आहे. या विश्वासांगीकाराशी परिचित होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने "येशू ख्रिस्त हा प्रभु आहे" हे जाणून घ्यावे अशी आमची इच्छा आहे.

## विश्वासांगीकार

या विश्वासांगीकारात सहा ओव्या किंवा कलमी आहेत. पहिल्या ओवित प्रस्तावना दिली आहे ज्यात दोन प्रमुख क्रियापदे आहेत : *कबूली* आणि *हर्षोल्लास.* देवानें पवित्र शास्त्रात स्वतःला आणि त्याच्या इच्छेला प्रकट केले आहे. तरीही, "गुप्त गोष्टी" अजूनही आपला देव परमेश्वर ह्याच्याकडे आहेत (अनुवाद २९:२९). ईश्वरविज्ञानशास्त्राचे धर्मसिद्धांत मांडतांना आपण आपल्या मर्यादा नेहमी लक्षात ठेवल्या पाहिजेत. म्हणून आम्हीं शुभवर्तमानातील *रहस्य* आणि *अद्भुत* गोष्टींवर विश्वास ठेऊन सुरुवात करतो. या विश्वासांगीकाराचे मुख्य लक्ष देह धारणेवर आहे, ज्याची आपण *देव देही झाला* या शब्दांनी थोडक्यात व्याख्या करतो. ख्रिस्ताचे व्यक्तीत्व आपल्याला लगेच ख्रिस्ताच्या कार्याकडे घेऊन जाते, म्हणून आम्हीं ख्रिस्ताच्या तारणाच्या कार्यात एकत्रितपणे आनंद करतो.

दुसरी ओवी ख्रिस्ताच्या पूर्ण देवत्वावर जोर देते, त्याला त्रैक देवत्वाच्या व्यक्तींमध्ये बरोबरीचे स्थान दिलेले आहे. ह्या ओवीचा समारोप चाल्सेडॉनच्या व्याख्येतील चाल्सेडोनियन सूत्राची पुनरावृत्ती करून होतो. देह धारण झाल्यापासून, ख्रिस्ताच्या एकाच व्यक्तीमध्ये दोन स्वभाव विद्यमान आहेत आणि ते कायम तसेच राहतील.

तिसरी ओवी देह धारणाच्या विवरणाने व्यापलेली आहे, जी ख्रिस्ताच्या पूर्ण मनुष्यपणावर जोर देते. तो जन्मला. तो इमॅन्युएल आहे, ज्याचा अर्थ "आम्हांबरोबर देव" (मत्तय १:२३). येथे

आपण त्याचा मृत्यू, त्याचे पुरले जाणे, पुनरुत्थान, स्वर्गारोहण आणि दुसरे आगमन यावर विश्वास ठेवतो. ही देह धारणाची ऐतिहासिक तत्थ्ये आहेत.

त्यानंतर चौथ्या कलमीत देह धारणातील ईश्वरविज्ञानशास्त्रीय तथ्यांचे वर्णन आहे, जे धर्मसुधारणेच्या काळापासून प्राप्त झालेल्या अंतर्दृष्टींमधून घेतलेली आहेत. आमच्यासाठी, येशू पूर्णपणे आज्ञाधारक राहिला. त्याने नियमशास्त्राचे *पालन केले* (ज्याला सक्रिय आज्ञाधारकपणा म्हणतात) आणि नियमशास्त्राचा दंड भरला (निष्क्रिय आज्ञाधारकपणा म्हणतात). तो निष्कलंक कोकरा होता, त्याने आमचे स्थान घेऊन आम्हांसाठी प्रायश्चित केले. त्याने ती सर्वात गंभीर समस्या सोडवली जिला सर्व मानवजातीला सामोरे जावे लागते : पवित्र देवाचा क्रोध. ह्या ओवीचा अदला-बदलीचा सिद्धांत घोषित करून शेवट होतो. आमची पापे ख्रिस्तावर टाकण्यात आली, किंवा त्याच्यावर गणली गेली, आणि त्याचे नीतिमत्व आमच्यावर टाकण्यात आले. ख्रिस्ताने आमच्यासाठी जे केले केवळ त्यामुळेच आमचा देवासोबत समेट झाला आहे. आम्हांला त्याचे नीतिमत्व परिधान करून देण्यात आलेले आहे.

ख्रिस्ताचे त्रीपदरी कार्य (संदेष्टा, याजक, आणि राजा म्हणून ख्रिस्ताचे मध्यस्थीचे त्रिविध कार्य) ही एक उपयुक्त ईश्वरविज्ञानशास्त्रीय रचना आहे, जी ख्रिस्ताच्या कार्याचे थोडक्यात वर्णन करते. जुन्या करारात संदेष्टा, याजक आणि राजा ही मध्यस्थीची तीन कर्तव्ये वेग-वेगळी होती. येशू त्याच्या एका व्यक्तीत्वामध्ये ही तिन्ही कर्तव्ये उत्तम रीतीने पार पाडतो. येथे आपण केवळ वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या भूतकाळातील मध्यस्थीच्या कार्यावरच विचार करत आहोत असे नाही, तर पित्याच्या उजव्या हाताला बसलेला आपला मध्यस्थ म्हणून त्याच्या वर्तमान कार्याबद्दल देखील विचार करित आहोत.

शेवटची ओवी एकमेव, संक्षिप्त विश्वासांगीकार आहे : *येशू ख्रिस्त प्रभु आहे*. सर्व खरे ईश्वरविज्ञानशास्त्र ईशस्तवन किंवा उपासनेकडे निर्देश करते. परिणामी, विश्वासांगीकाराचा शेवट *स्तवन* ह्या मुख्य क्रियापदाने होतो. आता ख्रिस्ताची उपासना केल्याने, आपण आपल्या अनंतकालीन कार्याची तयारी करित आहोत.

## समर्थन आणि नकाराची सव्वीस कलमे

या विश्वासांगीकारातील शब्दावली ख्रिस्तसिद्धांताच्या अभ्यासाचे प्रवेशद्वार आहे, आणि ती आम्हांला ख्रिस्ताचे व्यक्तीत्व आणि कार्य या विषयांवर पवित्र शास्त्रात समृद्ध असलेल्या शिक्षणाचे संशोधन करण्याचे आव्हान करते. आम्हांला पुढील गोष्टींविषयी मार्गदर्शन करण्यासाठी, समर्थन आणि नकाराचे सव्वीस कलम सामील केले गेले आहेत व त्यापैकी प्रत्येकासाठी पवित्र शास्त्रातील पुरावे देखील दिले आहेत. प्रत्येकासाठी एक मुख्य वचन पूर्णपणे नमूद करण्यात आलेले आहे, त्याच बरोरार इतर शास्त्र-संदर्भ देखील देण्यात आले आहेत. हे कलम महत्त्वाचे आहेत. ते ख्रिस्ताच्या व्यक्तीत्वाविषयी आणि कार्याविषयी पवित्र शास्त्रातील शिकवणीला धरून सीमारेषा घालतात.

कलम १ हा प्रस्तावनात्मक आहे, आणि तो देह धारणाचे समर्थन करतो.





कलम २ ख्रिस्ताच्या पूर्ण देव असल्याची स्थापना करतो, तर कलम ३-५ पवित्र शास्त्राचे एक-व्यक्ती, दोन-स्वभावाचे ख्रिस्तसिद्धांत मांडतात. कलम ६-९ ख्रिस्त वास्तविक पूर्ण मानव असल्याच्या सत्याचा उलगडा करतात. कलम १०-२६ ख्रिस्ताच्या व्यक्तीत्वाकडून ख्रिस्ताच्या कार्याकडे वळतात. तारणाच्या सिद्धांतांची पुष्टी करण्यापासून त्यांचा आरंभ होतो आणि शेवट ख्रिस्ताच्या त्रिविध कर्त्यव्याच्या वर्णनासह होते.

नकार कथने अत्यंत महत्वाची आहेत. आपल्या सहिष्णुतेच्या युगात एखादा विश्वास नाकारण्याचे गृहीत धरणे हे अप्रचिलित आहे, परंतु समर्थन आणि नकाराची ही कलमे स्वाभिमानास्पदरीतीने गृहीत धरण्यासाठी नाहीत. त्याऐवजी, ती मंडळीला पवित्र शास्त्रसंबंधी शिकवणीच्या सुरक्षित आणि समृद्ध मर्यादेत राहण्यास मदत करण्याच्या आशेने दिली आहेत. दुसरे योहान ९ घोषित करते की, “ख्रिस्ताच्या शिक्षणाला चिकटून न राहता जो पुढेपुढेच जातो त्याला देव प्राप्त झाला नाही.” याचा अर्थ ख्रिस्ताच्या पवित्र शास्त्रातील शिकवणीच्या पुढे जाणे किंवा देवाच्या वचनात प्रकट केल्याप्रमाणे ख्रिस्तसिद्धांताच्या ठरवून दिलेल्या सीमांच्या पलीकडे जाणे होय. विश्वासांगीकाराच्या विविध ओळींचे जसजसे ही सव्वीस कलमे स्पष्टीकरण देतात, तसतसे ही कलमे स्वतः ख्रिस्ताबद्दलच्या पवित्र शास्त्रातील शिकवणीकडे आपल्याला घेऊन जाऊ शकतात.

काहीजणांना योग्य प्रश्न पडू शकतो की एका नवीन विश्वासांगीकाराची गरजच का आहे. हा एक चांगला प्रश्न आहे. या विश्वासांगीकारासाठी आम्हीं तीन कारणे देऊ शकतो. आमचा असा विश्वास आहे की या विश्वास-कथनामध्ये प्राचीनकाळातील आणि सध्यकाळातील आव्हानांना संबोधित केल्यामुळे हे विश्वास-कथन मंडळीच्या उपासनेला आणि सुशिक्षनाला उपयुक्त ठरेल. आमचा असाही विश्वास आहे की हे विश्वास-कथन शुभवर्तमानाच्या सेवेत असलेल्या सेवकांना सेवाकार्यात खरोखर भागीदार असलेल्या इतरांना ओळखण्यास उपयुक्त ठरतील. शेवटी, आम्हांला असेही वाटते की येणारा काळ मंडळीसाठी आव्हानात्मक असणार आहे आणि आम्हांला विश्वास आहे की हा विश्वासांगीकार आम्हांला शुभवर्तमानाचे सार - त्याचे सौंदर्य, त्याची आवश्यकता आणि त्याची निकड यांची आठवण करून देईल. खाली दिलेल्या प्रत्येक कारणाचा नीट विचार करा :

## उपासना आणि बोध करण्यासाठी

लिगोनियर नम्रपणे मंडळीसाठी हा विश्वासांगीकार सादर करत आहे. सुरवातीच्या शतकांपासून, ख्रिस्ती लोकांनी मंडळीमध्ये धार्मिक विधींमध्ये मातांगीकारांचा वापर केला आहे. आम्हीं आशा करतो की हा विश्वासांगीकार तोच उद्देश पूर्ण करेल. पवित्र शास्त्रातील शिकवणीच्या विशाल क्षितिजांचा शोध घेण्यासाठी हा विश्वासांगीकार शिक्षणाचे एक उपयुक्त साधन असू शकतो. आम्हीं अशीही आशा करतो की हा विश्वासांगीकार आणि त्या संबंधीच्या सव्वीस कलमी

विश्लेषणाचा उपयोग पवित्र शास्त्राचा शोध घेण्यासाठी आणि त्यावर मनन करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून मंडळीमध्ये केला जाईल. येशू ख्रिस्ताचे व्यक्तीत्व आणि कार्य यांचे सिद्धांत मंडळीच्या एकात्मतेसाठी आणि आरोग्यासाठी आवश्यक आहेत. मंडळीच्या प्रत्येक पिढीने ख्रिस्ताच्या व्यक्तीत्वाबद्दल आणि कार्याबद्दल असलेल्या शास्त्रसम्मत मतांचा पुन्हा अभ्यास करणे आणि त्यावर विश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आमचा असा विश्वास आहे की हा विश्वासांगीकार त्यासाठी उपयुक्त ठरेल.

### शुभवर्तमानामध्ये सर्वसामान्य सिद्धांतासाठी

जगभरात गैर-सांप्रदायिक मंडळ्या, संस्था आणि चळवळी वाढत आहेत - शुभवर्तमानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अनेकजण सेवेत आहेत. प्रसंगी चांगली भागीदारी आणि संबंध कोठे आहेत हे ओळखणे कठीण होते. कदाचित हा विश्वासांगीकार ख्रिस्तातील सहकारी बंधूभगिनीना ओळखण्यासाठी आणि शुभवर्तमानासाठी होत असलेल्या समान प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल.

### सांप्रत काळासाठी

ऑक्सफर्ड विद्यापीठ असलेल्या नगरात थॉमस क्रॅनमर, निकोलस रिडले आणि ह्यू लॅटिमर यांसारख्या ब्रिटनच्या सुधारकांनी केलेल्या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी शहीद स्मारक उभे आहेत. हे स्मारक त्यांच्याबद्दल असे सांगते की त्यांनी त्यांची शरीरे जाळण्यासाठी दिली, त्यांनी पवित्र सत्याची साक्ष दिली आणि त्याचे समर्थन केले आणि रोमन कॅथलिक चर्चच्या खोट्या शिक्षणाच्या विरोधात ते उभे राहिले, तसेच केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याचीच नाही, तर त्याच्यासाठी दुःख भोगण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती या गोष्टीचा त्यांनी आनंद केला.

त्यांनी येशू ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाच्या पवित्र सत्यांवर विश्वास ठेवला, त्याचे समर्थन केले आणि त्यात ते ठाम राहिले. या सत्यांची साक्ष देत असताना, त्यांनी सत्याची घोषणा केल्या, त्यांचे समर्थन केले आणि त्यांच्यासाठी दुःखही सोसले. शतकानुशतके अनेकजण या धर्म-सुधारकांमध्ये सामील झाले आहेत. आधुनिक पाश्चात्य जगातील बहुतेक ख्रिस्ती मंडळयांना धार्मिक स्वातंत्र्य लाभले आहे. हे स्वातंत्र्य किती काळ टिकेल हा वेगळा प्रश्न आहे. या पिढीला किंवा येणाऱ्या पिढ्यांना ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यामुळे दुःख सहन करावे लागेल. तयार न राहणे मूर्खपणाचे ठरेल तसेच पुढच्या पिढीला तयार न करणे देखील मूर्खपणाचे ठरेल.

खरोखरच, ख्रिस्ताच्या व्यक्तीत्वाबद्दल आणि कार्याबद्दलची ही सत्ये विश्वास ठेवण्यास, समर्थन करण्यास, त्यावर ठाम राहण्यास आणि त्यांच्यासाठी दुःख भोगण्यास योग्य आहेत. जीवन ख्रिस्तामध्येच आहे.

ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवनात एक क्षण असा होता जेव्हा लोकसमुदाय त्याला





सोडून गेला होता आणि तो केवळ त्याच्या शिष्यांसोबत होता. तेव्हा त्याने त्यांना विचारले की त्याला सोडून जावे असे त्यांनाही वाटते का? तेव्हा शिष्यांच्यावतीने पेत्र म्हणाला : “प्रभुजी, आम्हीं कोणाकडे जाणार? सार्वकालिक जीवनाची वचने आपणाकडे आहेत, आणि आम्हीं विश्वास ठेवला आहे आणि ओळखले आहे की देवाचा पवित्र तो पुरुष आपण आहात” (योहान ६:६८-६९). कालांतराने, बाराजणांपैकी एकाच्या मनात शंका निर्माण झाली. येशूला वधस्तंभावर खिळण्यात आले होते आणि त्याला पुरण्यात आले होते. त्याच्या पुनरुत्थानाची साक्ष होती, तरीही थोमाला शंका वाटली. नंतर येशूने थोमाला दर्शन दिले. त्याने ख्रिस्ताच्या जखमांच्या व्रणांना स्पर्श केला, त्या जखमा तर त्याला आमच्या पापांसाठी झाल्या होत्या. थोमाने कबूल केले, “माझा प्रभु आणि माझा देव!” (योहान २०:२८).

आमचाही तोच विश्वास आहे. आम्हींही तोच अंगीकार करतो.